# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २५ मार्च, २०२५ / चैत्र ४, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री** | |
| **(३)** | **इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री** | |
| **(४)** | **पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री** | |
| **(६)** | **परिवहन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३५**

---

### मालेगांव (जि.नाशिक) शहरातील मोसमपूल चौकात दोन व्यक्तींची फसवणूक केल्याबाबत

**(१) * ७१४ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरातील मोसमपूल चौकातील एकता हॉटेलसमोर असलेल्या मका पिकाचे केवळ फोटो दाखवून दोन व्यक्तींची ५ लाख १३ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी ३० टन मक्याचे बनावट देयकापोटी रुपये ५ लाख १३ हजार इतकी रक्कम संशयीत व्यक्तीच्या खात्यात जमा केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर फसवणूक प्रकरणी छावणी पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी छावणी पोलीस ठाणे, मालेगाव येथे दि.१३.०१.२०२५ रोजी गु.र.क्र.१६/२०२५, भा.न्या.सं. कलम ३१८(४), ३१६(२), ३(५) अन्वये दोन आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, ओरोस (जि. सिंधुदुर्ग) येथील जिल्हा उपनिबंधक व कार्यालय अधिक्षक यांना लाच घेताना पकडल्याबाबत

**(२) * ६५०३ श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, ओरोस (जि.सिंधुदुर्ग) येथील जिल्हा उपनिबंधक, श्री.माणिक भानुदास सांगळे व कार्यालय अधिक्षक, श्रीमती उर्मिला महादेव यादव यांना रुपये ३३ हजार इतक्या रकमेची लाच स्वीकारताना पकडण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यकाळातील सर्व प्रकरणे तपासण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) I. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंध विभागामार्फत करण्यात आलेल्या लाच मागणीच्या पडताळणी कारवाईमध्ये आरोपी लोकसेविका, कार्यालय अधीक्षक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सिंधुदुर्ग, ओरोस (वर्ग-३) यांनी तक्रारदार यांच्याकडे श्री.स्वामी समर्थ गृहनिर्माण संस्था मर्या., या गृहनिर्माण संस्थेच्या कन्व्हीन्स डिड मानीव अभिहस्तांतरण आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी स्वतःसाठी व वरिष्ठांसाठी रुपये ४०,०००/- इतक्या लाचेच्या रकमेची मागणी केल्याचे तसेच आलोसे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सिंधुदुर्ग, ओरोस (वर्ग-१) यांनी तक्रारदार यांच्याकडे उपलब्ध असलेल्या रुपये ३३,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करुन आरोपी लोकसेविका कार्यालय अधीक्षक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना सदर लाचेची रक्कम स्विकारण्यास सांगून प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले आहे.
II. तद्नंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेविका यांनी तक्रारदार यांच्याकडून ३३,०००/- रुपये इतकी लाचेची रक्कम स्विकारली म्हणून सिंधुदुर्गनगरी पोलीस ठाणे येथे भ्रष्ट्राचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) च्या कलम ७, ७अ व १२ अन्वये गु.र.नं. १०/२०२५ प्रमाणे दिनांक ०५.०२.२०२५ रोजी दोन्ही आलोसे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याच दिवशी त्यांना अटक करण्यात आली.
III. सदर गुन्हयाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरु आहे.
IV. सदर प्रकरणी, जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालय तपासणीकरिता जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड यांची तपासणी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी, दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने, आरोपी लोकसेवक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सिंधुदुर्ग, ओरोस (वर्ग-१) व आरोपी लोकसेविका, कार्यालय अधीक्षक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सिंधुदुर्ग, ओरोस (वर्ग-३) यांना अटक केल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक ०५.०२.२०२५ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दहागाव (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील परिवहन विभागाचे योग्यता प्रमाणपत्र नसलेल्या स्कूल बस चालविण्यात येत असल्याबाबत

**(३) * ५४०९ श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहागाव (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील एका शाळेच्या बसचा दिनांक २४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास अपघात होऊन एका विद्यार्थीनीचा मृत्यू झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यात परिवहन विभागाचे योग्यता प्रमाणपत्र (फिटनेस सर्टिफिकेट) नसलेल्या सुमारे १५० अनफिट शाळेच्या बस रस्त्यावर चालविण्यात येत असून शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना करुन उक्त प्रकरणी दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) होय. वाहन क्रमांक MH २९ M ८४८८ हे वाहन दिनांक २४.०१.२०२५ रोजी अपघातग्रस्त झाले होते. यामध्ये एका विद्यार्थिनीचा मृत्यू झाला आहे.
(२) व (३) प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या अभिलेखावरील नोंदीच्या अनुषंगाने यवतमाळ जिल्ह्यामध्ये योग्यता प्रमाणपत्राची वैधता संपलेल्या स्कूल बसची संख्या ७२ आहे. प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकडून स्कूल बसची वेळोवेळी तपासणी मोहिम राबविण्यात येते. यानुषंगाने १०७ स्कूल बसची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ३४ स्कूल बस दोषी आढळलेल्या असून त्यांच्याकडून रक्कम रु. १,०४,०००/- वसुल करण्यात आली आहे. ज्या स्कूल बसचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण संपलेले आहे अश्या वाहन धारकास प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकडून नोटीस पाठविण्यात आलेल्या आहेत. तसेच वायुवेग पथकास स्कूल बसची तपासणी करणेकरिता विशेष मोहिम राबविण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेंतर्गत खाण विकासासाठी समान प्रमाणात निधी वितरीत करण्याबाबत

**(४) * २५०९ श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेंतर्गत खाण अथवा खाणसमूहाच्या सिमेपासून जास्तीत जास्त २५ कि.मी. पर्यंतच्या प्रत्येक बाधित क्षेत्राकरिता व १५ कि.मी. पर्यंतच्या अप्रत्यक्ष बाधित क्षेत्रापर्यंत विकास कामासाठी निधीचा वापर करता येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत उपलब्ध विकास निधी प्रत्यक्ष बाधित क्षेत्रावर ७०% व अप्रत्यक्ष बाधित क्षेत्रावर ३०% निधी खर्च करण्यात येणार आहे तथापि, विकास निधी वितरीत करताना गडचिरोली जिल्ह्यासाठी शासन निर्णयातील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष बाधित शब्द वगळून जिल्ह्यात समान प्रमाणात निधी वितरीत करण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यासाठी खाण व खाण समूहाचे उत्खननातील गौण खनिज वाहून नेणाऱ्या मोठ्या वाहनांमुळे रस्त्यांची दुरवस्था होवून नागरिकांचा अपघातात मृत्यू होत असून तेथील प्रदूषणात देखील वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई :** (१) खाण मंत्रालय, भारत सरकार यांचे आदेश दि.१५.०१.२०२४ मधील १ (१.१) प्रत्यक्ष बाधीत क्षेत्र म्हणजे असे क्षेत्र जे गौण खनिजाच्या खाणी व्यतिरिक्त इतर खाणींसाठी १५ कि.मी. पर्यंतच्या त्रिज्येचे असेल. अप्रत्यक्ष बाधीत क्षेत्र हे प्रत्यक्ष बाधीत क्षेत्राच्या पलीकडे असेल व गौण खनिजा व्यतिरिक्त इतर खाणींपासून २५ कि.मी. च्या त्रिज्येच्या बाहेर नसेल. यातील कामासाठी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेअंतर्गत निधीचा विनियोग करता येतो.

(२) खाण मंत्रालय, भारत सरकार यांचे आदेश दि.१५.०१.२०२४ मधील मुद्दा क्र ३.२ मध्ये तसेच शासन निर्णय दि.११.१०.२०२४ मधील मुद्दा क्र. ४.२ नुसार उपलब्ध खनिज विकास निधीच्या किमान ७०% निधी हा प्रत्यक्ष बाधीत क्षेत्राकरीता व अप्रत्यक्ष बाधीत क्षेत्राकरीता कमाल ३०% पर्यंत निधी खर्च करण्यात यावा अशी तरतुद आहे. सदर तरतुदीनुसारच गडचिरोली जिल्हा खनिज प्रतिष्ठान मधून निधी खर्च करणे अपेक्षित आहे.

(३) रस्त्याची दुरवस्था होणाऱ्या अनेक कारणामध्ये खनिज वाहून नेणाऱ्या मोठ्या वाहनाचा समावेश असू शकतो. सदर रस्ते दुरूस्ती व नविन रस्ते घेण्याची तरतूद राष्ट्रीय, राज्य व जिल्हा स्तरावरील योजनेमध्ये तसेच जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी अंतर्गत करण्यात येते.

रस्ते अपघातांची नोंद अपघात घडला असणाऱ्या कार्यक्षेत्राच्या पोलीस स्टेशनमधील प्रथम खबरी आहवालामध्ये अपघाताची कारणे व स्थिती नमूद असते. परंतु सदर अपघात केवळ गौण खनिज वाहून नेणाऱ्या वाहनामुळे झाल्याची माहिती उपलब्ध नाही. पोलिस अधिक्षक, गडचिरोली यांनी दिलेल्या अहवालानुसार सन-२०२३ मध्ये जिल्ह्यात १३ आणि सन २०२४ मध्ये ५ व्यक्तींचा मृत्यु रस्ते अपघातामुळे झालेला आहे.

(४) परिवहन अधिकारी व पोलीस विभागाने सुचविलेल्या अपघात प्रवण स्थळांची सुधारणा करण्याचे काम कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, गडचिरोली यांनी हाती घेतलेले आहे.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(५) * ५०३२ श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात अनेक पर्यटन प्रकल्प सुरु असून पर्यटन वाढीसाठी सध्या अस्तित्वात असलेल्या विविध योजना व पर्यटनाकरिता देण्यात येणाऱ्या सवलतींच्या अनुषंगाने राज्यस्तरावर समिती स्थापन करुन सर्व पर्यटन योजनांना गती देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेळागर (जि.सिंधुदुर्ग) येथे नियोजित ताज प्रकल्प पूर्ण करण्यासाठी पर्यावरणासह स्थानिक नागरिकांकडून आवश्यक त्या परवानग्या घेण्यात आल्या आहेत काय,

(३) असल्यास, चांदा ते बांदा प्रकल्पातील मंजूर कामांसाठी वर्ग करण्यात आलेल्या निधीची कामे तसेच उक्त जिल्ह्यात सुरु होणारी सबमरीन, दोडामार्ग तालुक्यातील तिलारी पाटबंधारे प्रकल्पातील वॉटर स्पोर्टस या कामांना गती देण्यासाठी व सुरु असलेले इतर पर्यटन प्रकल्प लवकर पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई :** (१) हे खरे नाही. अशी समितीबाबत प्रस्ताव विचाराधीन नाही.

(२) होय, हे अंशत: खरे आहे. सर्व संबंधित यंत्रणांच्या परवानगी घेणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) चांदा ते बांदा योजनेंतर्गत सिंधुदुर्ग जिल्हयातील महत्वाच्या ठिकाणी दिशादर्शक व माहिती फलके अशी कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

सिंधुदुर्ग जिल्हयातील वेंगुर्ला तालुक्यातील समुद्रातील पाण्याखालील सागरी विश्व पर्यटकांना उपलब्ध करुन देण्याकरीता भारतीय नौदलाच्या निवृत्त युध्द नौकेच्या माध्यमातून कृत्रिम प्रवाळ निर्माण करुन जागतिक दर्जाचे स्कुबा डायव्हिंग आणि पाण्याखालील पर्यटनाचे आकर्षण निर्माण करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील कोरेगाव पार्क परिसरात अवैध हुक्का पार्लर सुरु असल्याबाबत

**(६) * ४२६५ श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील कोरेगाव पार्क परिसरात अवैध हुक्का पार्लर सुरु असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने कायदा (COTPA), २००३ अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानास बंदी असताना, हुक्का पार्लर चालविणाऱ्यांवर कोणतीही कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे शहरातील हुक्का पार्लरपैकी किती पार्लर परवानाधारक आहेत आणि किती अनधिकृतपणे चालवले जात आहेत तसेच निकोटिनयुक्त पदार्थ वापरून आरोग्यास धोका निर्माण करणाऱ्या हुक्का पार्लरवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने पुणे शहरातील कोरेगाव व इतर परिसरात चालू असणाऱ्या हुक्का पार्लरवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

हॉटेल पाल्मोको, कोरेगाव पार्क, पुणे येथे अवैधरित्या तंबाखुजन्य फ्लेवर्स असलेले हुक्का मिळून आल्याने तसेच, मद्यविक्रीचा परवाना नसताना मद्य साठा आढळून आल्याने पोलीस स्टेशन, कोरेगाव, पुणे येथे दिनांक १९.०१.२०२५ रोजी गु.र.नं. ०९/२०२५ अंतर्गत सिगारेट आणि इतर तंखाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ मधील (महाराष्ट्र सुधारणा) २०१८ चे कलम ४-क, २१-क आणि महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपींना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५ (३) नुसार नोटीस देण्यात आली असून, गुन्ह्याचा तपास सुरू आहे.
(३) व (४) सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ मधील (महाराष्ट्र सुधारणा) २०१८ अन्वये राज्यात तंबाखुजन्य हुक्का पार्लरवर बंदी लागू करण्यात आली असून, पोलीसांमार्फत हुक्का पार्लर चालविण्यासाठी कोणताही परवाना देण्यात येत नाही. तसेच, पोलीस स्टेशन हद्दीतील शैक्षणिक संस्था, सोसायट्यांमध्ये तंबाखुजन्य पदार्थ, हुक्का यापासून परावृत्त करण्यासाठी समुपदेशन, कार्यक्षेत्रात जनजागृती, कायदेशीर कार्यवाही करून या धंद्याचे समूळ उच्चाटनासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यक्षेत्रामध्ये सन २०२३ ते सन २०२५ (फेब्रुवारी अखेरपर्यंत) या कालावधीत अनधिकृत हुक्का पार्लरवर कारवाई करून २३१ आरोपींविरूद्ध १०८ गुन्हे दाखल असून रू. १.८३ कोटीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौ.सिरसम (पा) (ता.पालम, जि.परभणी) येथे स्थापित करण्यात आलेल्या रोहित्र केंद्रांना सुरक्षा कुंपण लावण्याबाबत**

**(७) * १४७६ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.सिरसम (पा) (ता.पालम, जि.परभणी) येथील ग्रामीण भागात शाळा परिसरात व रस्त्याच्या बाजूला स्थापित करण्यात आलेले रोहित्र केंद्रे उघडयावर असल्याने धोका निर्माण झाला असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याठिकाणी वारंवार अपघात होऊन जिवितहानी होत असल्याने सदर रोहित्र केंद्राना तात्काळ सुरक्षा कुंपण लावण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रोहित्र केंद्राना सुरक्षा कुंपण लावण्यासह याकडे दुर्लक्ष करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) महावितरणच्या परभणी मंडळातंर्गत परभणी विभाग क्र. २ मध्ये जिंतुर, सेलू, गंगाखेड, सोनपेठ, मानवत व पालम असे एकूण ६ विभाग आहेत. मौ.सिरसम (पा) हा ग्रामीण भाग पालम उप विभागातर्गंत येतो. सदर ठिकाणी शाळा परिसरात व रस्त्याच्या बाजूला सिरसम गावठाण येथे रोहित्र केंद्र आहे.

सदर रोहित्राचा बॉक्स सुस्थितीत असून, त्याचा दरवाजा हा उघडा नसून बंद स्थितीत आहे. सदर रोहित्र केंद्रावर कोणत्याही प्रकारची धोकादायक स्थिती नाही. तसेच सदर रोहित्र केंद्राला सुरक्षा कुंपण लावण्याबाबत महावितरण कार्यालयास मागणी प्राप्त नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या विमुक्त आणि भटक्या प्रवर्गासाठीच्या आश्रमशाळांना अनुदान मिळणेबाबत**

**(८) * ६५५५ श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या एकूण ९७७ विमुक्त आणि भटक्या प्रवर्गासाठीच्या (व्हीजेएनटी) आश्रमशाळा सुरु असून त्यामध्ये या प्रवर्गातील कुटुंबाच्या गरीब, ऊस तोड कामगार व भटकंती करणाऱ्या कामगारांची मुले शिक्षण घेत असून त्यापैकी बहुतांश शाळा या फक्त प्राथमिक शाळा (वर्ग १ ते ७ वी) असल्याने या प्रवर्गातील विद्यार्थी पुढील शिक्षण व त्याअनुषंगाने मिळणाऱ्या सोयी-सुविधांपासून वंचित राहत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा सर्व प्राथमिक शाळांना नैसर्गिक वर्ग वाढीने वर्ग ८ वी ते १० वी पर्यंत वर्ग वाढ देऊन उच्च माध्यमिक शाळांमध्ये रुपांतरीत करण्याची मागणी होत असून याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच या शाळांसाठी मिळणारे शासकीय अनुदान देखील प्रलंबित असल्याने शाळेचे प्रशासन, व्यवस्थापन व कर्मचारी यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या शाळांना वर्गवाढ व प्रलंबित असलेले अनुदान मंजूर करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) हे खरे नाही.

(२) इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या ९८० विजाभज खाजगी अनुदानित निवासी आश्रमशाळांपैकी ५३० प्राथमिक निवासी आश्रमशाळा असून यातील ५९ प्राथमिक आश्रमशाळांना शासन निर्णय, दि.१९.०७.२०१९ अन्वये बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, (RTE) २००९ मधील तरतुदीनुसार इयत्ता ८ वी चा वर्ग मंजूर केलेला आहे.

तथापि, सरसकट सर्व प्राथमिक आश्रमशाळांना इयत्ता ८ वी वर्ग मंजूर करण्याचे शासनाचे धोरण नाही. तसेच इ.९ वी व १० वी स्वतंत्र माध्यमिक शाळा असल्याने ज्या प्राथमिक आश्रमशाळेत आवश्यक पायाभूत सुविधा, विद्यार्थी इ. बाबी आहेत अशा प्राथमिक आश्रमशाळांनी नैसर्गिक वाढीने वर्गवाढ मिळणेबाबत विभागाकडे केलेल्या विनंतीनुसार, शासन परिपत्रक, दि.२९.१०.२०२० नुसार आवश्यक पायाभूत सुविधांची पुर्तता करणाऱ्या ९६ प्राथमिक आश्रमशाळांना इयत्ता ८ वी वर्ग, तदनंतर त्यापैकीच ६१ आश्रमशाळांना इयत्ता ९ वी वर्ग व त्यापुढील वर्षात त्यातील ३१ आश्रमशाळांना इयत्ता १० वी वर्ग वित्त विभागाच्या मान्यतेअधिन राहुन स्वखर्चाने वर्ग चालविण्याच्या अटीवर नैसर्गिक वाढीने मंजूर केलेला आहे. यातील इयत्ता ८ वी च्या वर्गांना RTE नुसार व तद्नंतर इयत्ता ९ वी व १० वी वर्गांना नैसर्गिक वाढीने मान्यता देवून वेतन व वेतनेतर अनुदान लागु करण्याबाबतचा प्रस्ताव नियोजन व वित्त विभागामार्फत धोरणात्मक निर्णयासाठी मा.मंत्रीमंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात आला आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात उक्त शाळांतील निवासी विद्यार्थ्यांचे परिपोषण अनुदान तसेच वेतनेतर अनुदानासाठी अर्थसंकल्पित रु.२००.०० कोटी तरतूदीपैकी रु.१६०.०० कोटी इतका निधी संचालक यांचेमार्फत सर्व आश्रमशाळांना समप्रमाणात वितरीत केला असून सुधारीत अंदाजात पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध रु.५०.०० कोटी सह एकूण ९० कोटीचा निधी राज्यातील सर्व आश्रमशाळांना वितरीत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील अल्पसंख्याक मुलींच्या वसतीगृहातून दीड कोटींचे साहित्य चोरी गेल्याबाबत

**(९) * ४७७७ श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील स्थानिक धामणगाव मार्गावरील अल्पसंख्याक मुलींसाठी उभारण्यात आलेल्या वसतीगृहातील दीड कोटीचे साहित्य प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे चोरटयांनी चोरी केले असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी व याकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे.

धामणगांव रोड, यवतमाळ येथील अल्पसंख्याक मुलींच्या वसतिगृहाचे कुलूप तोडून वसतिगृहामध्ये असलेले खुर्ची, अलमारी, टेबल्स, बुक्स अलमारी, गादी, पलंग असे एकूण रु.११,८४,६४०/- इतक्या रक्कमेचे साहित्य तसेच, खिडक्यांची ॲल्युमिनियम स्लायडिंग, विंडो फ्रेम, मुख्य दरवाजा वगळता अन्य सर्व दरवाजे, नळाच्या तोट्या, पाण्याच्या टाक्या, पाईप, इलेक्ट्रीक फिटींग्सचे केबल्स, बोर्ड इ. सामान चोरी गेल्याची फिर्याद दिनांक ०२.०१.२०२५ रोजी प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन, यवतमाळ येथे दि.०२.०१.२०२५ रोजी अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३३४ (१), ३०५ (ई) भारतीय न्याय संहिता-२०२३ अन्वये गु.र.नं.४/२०२५ दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) सदर गुन्ह्याच्या तपासात घटनास्थळ पंचनामा करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व शासकीय अभियंता, महाविद्यालयाचे प्राचार्य आणि विभाग प्रमुख यांचे जबाब नोंदविण्यात आले आहे. तसेच, परिसरातील भंगार विक्रेते, जुने फर्नीचर विक्रेते यांना सुचनापत्र देऊन त्यांना नमुद गुन्ह्यातील चोरीस गेलेले साहित्य विक्री करीता त्यांच्या दुकानात आल्यास त्याबाबत पोलीसांना खबर देण्याची सुचना देण्यात आली आहे. तसेच काही दुकानाची झडती घेण्यात आली असून चोरीस गेलेल्या साहित्याचा शोध घेण्यात आला आहे. पोलीस स्टेशन परिसरात मालमत्ता संबंधी गुन्हे करणाऱ्या सक्रिय गुन्हेगारांच्या घरांची झडती घेण्यात येऊन मुद्देमालाचा शोध घेण्यात आला. अद्यापपर्यंतच्या तपासामध्ये आरोपींचा तसेच साहित्याचा शोध लागलेला नाही. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेती पंपासाठी ऑफ ग्रीड सोलार पंप ऐवजी ग्रीड कनेक्टेड सोलार पंप वापरण्याबाबत

**(१०) * १९७२ श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेती पंपासाठी ऑफ ग्रीड सोलार पंप योजनेमुळे अतिरिक्त तयार होणारी वीज वापरली जात नसल्याने वीज वाया जात असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऑफ ग्रीड सोलार ऐवजी ग्रीड कनेक्टेड (Grid-connected) सोलार पंप वापरल्यास शेतकऱ्यांना योग्य दाबाने विद्युत पुरवठा होऊन ट्रान्सफॉर्मर वरील भार कमी होऊन ट्रान्सफॉर्मर जळण्याचे प्रमाण कमी होणार आहे व या एका ग्रीड कनेक्टेड सोलार निर्मितीमुळे दोन पंपाची वीज निर्मिती होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील शेती पंपासाठी ऑफ ग्रीड सोलार पंप ऐवजी ग्रीड कनेक्टेड सोलार पंप वापरण्याची मागणी जत येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २७ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्यात नवीन कृषीपंप ग्राहकांसाठी Off-Grid सोलार पंपाद्वारे वीज जोडणी देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. सदर योजना Grid-connected सोलार पंपासाठी लागू नाही. त्यामुळे Off-Grid सोलार पंपाद्वारे निर्माण झालेली अतिरिक्त वीज ही महावितरणच्या Grid-connected मध्ये घेणे शक्य नाही.

राज्यात शेती पंपासाठी Off-Grid सोलार पंप ही योजना चालू असल्यामुळे शेतकऱ्यांना सोलार पंप वापरणे करिता Off-Grid सोलार मुळे अतिरिक्त तयार होणारी वीज युनिव्हर्सल सोलर पंप कट्रोलर (USPC) द्वारे शेतीपुरक कामासाठी कडबा कटर, विद्युत वाहन, विद्युत ट्रॅक्टर इत्यादी वीजेवर चालणारी शेती उपकरणे चालविण्यासाठी वापरता येते. तसेच बॅटरी स्टोरेजद्वारे अतिरिक्त वीजेचा वापर करता येतो.

ज्या वीज वाहिन्या या योजनेमध्ये समाविष्ट नाहीत, अश्या वीज वाहिन्यावरील कृषीपंप Online Grid Connected पध्दतीने प्रायोगिक तत्त्वावर सौर ऊर्जीकरणाने जोडण्याबाबतची कार्यवाही चालू आहे. या योजनेअंतर्गत ज्या ठिकाणी ८ ते १० तास ऊर्जानिर्मिती होत आहे व ज्या कृषी पंपधारकांचा प्रत्यक्षात वापर कमी असतो अशा प्रायोगिक तत्त्वावर दोन वीजवाहिन्या निवडून मे. शक्ती पंप यांना पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (PPP) तत्त्वावर कृषी पंप Online Grid Connected पध्दतीने जोडण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. या प्रायोगिक तत्वावरील निकषावरुन पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. Grid connected सोलार पंप वापरल्यास अतिरिक्त तयार होणारी वीज Grid मध्ये अंत:क्षेपित करता येईल व ट्रान्सफॉर्मर वरील लोड कमी होऊन ट्रान्सफॉर्मर जळण्याचे प्रमाण कमी होईल.

(३) हे खरे आहे.

(४) महावितरणमार्फत प्रायोगिक तत्वावर (on- line Grid) सोलार पंपाबाबत पडताळणी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने परिक्षेचा निकाल जाहिर केल्यानंतरही संपूर्ण प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

**(११) * १८५० श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.छगन भुजबळ (येवला), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) राज्यसेवा २०२३ परिक्षेचा निकाल तीन महिन्यांपूर्वी जाहिर होऊनही आयोगाच्या नियोजनाअभावी संपूर्ण भरती प्रक्रिया प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी माहे जानेवारी, २०२४ मध्ये मुख्य परिक्षा व माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२४ या महिन्यात उमेदवारांच्या मुलाखती नंतर सर्वसाधारण गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करून पदांचे पसंतीक्रम ऑनलाईन सादर करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात येईल असे आयोगाने स्पष्ट केले असतांना सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यसेवा २०२२ च्या ६२३ उमेदवारांची पूर्वपरीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत होऊन उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, शिक्षणाधिकारी आणि इतर अन्य महत्वाच्या ६२३ पदांची गुणवत्ता यादी जाहीर करुन निवड झालेल्या उमेदवारांची अद्यापही नियुक्ती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करुन निवड झालेल्या उमेदवारांची त्वरीत नियुक्ती करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्यसेवा २०२३ च्या परीक्षेचा अंतिम निकाल अद्याप जाहीर झालेला नाही.

सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने ऑगस्ट-सप्टेंबर २०२४ या दोन महिन्यांच्या कालावधीत उमेदवारांची मुलाखतींसोबतच वैद्यकीय तपासणीची कार्यवाही केली. काही उमेदवारांनी वैद्यकीय अहवालाविरुद्ध अपील केले असून, त्याबाबतचा अहवाल प्रलंबित आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर उमेदवारांकडून प्राप्त पसंतीक्रमानुसार तात्पुरती निवड यादी प्रसिद्ध करून त्यानंतर उमेदवारांच्या ऑप्टींग आऊट विकल्पानुसार अंतिम शिफारस यादी (म्हणजेच निकाल ) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

राज्यसेवा २०२२ च्या परीक्षेची अंतिम शिफारस यादी दि.२५.१०.२०२४ रोजी आयोगाने प्रसिद्ध केली. त्यानुसार एकत्रित परिविक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत शिफारस केलेली ६१४ उमेदवारांपैकी ५५९ उमेदवार कागदपत्र पडताळणीस उपस्थित होते. सद्यस्थितीत कागदपत्र पडताळणीचे अहवाल प्राप्त झालेल्या एकुण ५४० उमेदवारांना नियुक्ती देण्यात आलेली आहे. उर्वरित उमेदवारांचे पडताळणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती आदेश देण्यात येतील.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आळंदी (जि.पुणे) येथील अनधिकृत बेकायदेशीर खासगी संस्था बंद करण्याबाबत

**(१२)** * **४९६ श्रीमती सरोज अहिरे (देवळाली) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आळंदी (जि.पुणे) येथे अनेक खाजगी वारकरी शिक्षण संस्था बेकायदेशीररित्या कार्यरत असून त्यामधे मुलांना लैंगिक अत्याचाराचे शिक्षण दिले जात असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्ञानेश्वर गुरुकुल संस्था, आळंदी या संस्थेत वारकरी शिक्षण घेणाऱ्या दोन अल्पवयीन वारकरी साधक विद्यार्थ्यांवर संस्थेत आलेल्या २८ वर्षीय वयाच्या तरुणाने अनैसर्गिक अत्याचार केल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू अनधिकृत खाजगी वारकरी शिक्षण संस्था ताबडतोब बंद करण्याची मागणी तेथील आंदोलकांनी करुन पोलिस उपायुक्त, आळंदी, जि.पुणे यांच्यासमोर ठिय्या आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याअनुषंगाने शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) ज्ञानेश्वरी गुरुकुल संस्था, आळंदी, पुणे या संस्थेतील दोन अल्पवयीन मुलांवर दि. ४.१.२०२५ रोजी लैंगिक अत्याचार झालेला असून आरोपी व संस्था चालकाची पत्नी यांच्यावर बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण

अधिनियम कलम ४,६,८ व २१ अन्वये गु.र.क्र. ०९/२०२५ दि. ५.१.२०२५ रोजी गुन्हा दाखल झालेला आहे.

जिल्हाधिकारी पुणे यांच्या मान्यतेने तपासणीकरीता प्रत्येकी ३ सदस्यांच्या एकुण २० समित्या गठीत करण्यात आल्या होत्या. सदर समित्यांनी आळंदी पोलीस स्टेशन यांच्याकडून प्राप्त १६८ संस्थांच्या यादीप्रमाणे संस्थांची तपासणी केली असून या संस्थांपैकी ९० संस्थांनी धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी केलेली आहे व ७८ संस्थांकडे कोणतेही नोंदणी प्रमाणपत्र आढळून आले नाही. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ नुसार अनधिकृत संस्थांवर कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय कोट्यातील सदनिका स्वस्तात देण्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याबाबत

**(१३)** * **६६२३ श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय कोट्यातील सदनिका स्वस्तात देण्याचे आमिष दाखवून २४ कोटी ५० लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पुरुषोत्तम चव्हाण यांच्यासह ११ जणांविरुद्ध सायन येथील विकासकाने केलेल्या तक्रारीच्या प्राथमिक चौकशीच्या अनुषंगाने आर्थिक गुन्हा शाखा, कुलाबा पोलीस ठाणे, मुंबई येथे दिनांक ३० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.पुरुषोत्तम चव्हाण यांनी नाशिक येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रासाठी टी शर्ट, हुडीचे कंत्राट, शासकीय भुखंड स्वस्तात मिळवून देतो असे सांगून सुरत (गुजरात) येथील व्यापाराची सुमारे साडेसात कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आणखी एक गुन्हा त्यांच्या विरुद्ध नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने या प्रकरणातील संबंधितांची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सर्व संबंधिताविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

सदर बाबत रु. २४ कोटी ७८ लाखांची फसवणुक केल्याप्रकरणी पुरुषोत्तम चव्हाण यांच्यासह ०८ आरोपी तसेच त्यांना मदत करणाऱ्यांविरुध्द दि.३०/०१/२०२५ रोजी आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे गु.र.क्र. १३/२०२५, कलम ४२०, ४१९, ४६५, ४६७, ४६८, ४७१, सह १२० (ब) भा.द.वि. १८६०, (कुलाबा पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र २७/२०२५) अन्वये गुन्हा नोंद आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर बाबत पुरुषोत्तम चव्हाण यांच्या विरुध्द रु. ७.४२ कोटी रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी दि. ३१/०१/२०२५ रोजी आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे गु.र.क्र. १४/२०२५, कलम ४२०, ४१९, ४६५, ४६७, ४६८, ४७१, सह १२० (ब) भा.द.वि. १८६० (कुलाबा पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र २९/२०२५) अन्वये गुन्हा नोंद आहे.

(३) व (४) i. सदर बाबत ईडी कडून प्राप्त कागदपत्रांच्या आधारे प्राथमिक चौकशी करुन गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

ii. आरोपी पुरुषोत्तम चव्हाण हे ईडीच्या अटकेत आहेत.

iii. तसेच पुरुषोत्तम चव्हाण यांच्या कोटक महिन्द्रा बँक व आयसीआयसीआय बँक लि. येथील खात्यांची माहिती प्राप्त करुन बँक खाती गोठविण्यात आलेली आहेत.
iv. सदर गुन्ह्याचा तपास चालू असून तपासाअंती निष्पन्न होणा-या आरोपींविरुध्द कारवाई करण्यात येत आहे.
vi आरोपीच्या राहत्या घराची दि.१९/०५/२०२४ रोजी घर झडतीतील कागदपत्रे मिळणेबाबत अंमलबजावणी संचलनालय यांना करण्यात आलेला आहे. पत्र व्यवहार आरोपींचे बॅक अकाउंटस, डिमॅट अकाउंटस व फिक्स डिपॉजिट्सची माहिती मिळणेबाबत TRans Union CIBIL Limited यांना पत्र पाठविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातून खाजगी बस प्रवासी ट्रॅव्हल्स मधून अवैधरित्या होत असलेल्या मालवाहतूकीबाबत

**(१४) * २५९६ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) व पुणे शहरातून गुजरात, मध्यप्रदेश, कर्नाटक, राजस्थानसह राज्यातील विविध भागात लांब पल्ल्याच्या मार्गावरील खाजगी ट्रॅव्हल्सना मालवाहतुकीची परवानगी नसतानाही कुरियरसह पार्सल सेवेच्या नावाने मोठ्या प्रमाणावर अवैध मालवाहतूक केली जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर खाजगी ट्रॅव्हल्सच्या मालवाहतुकीतून महाराष्ट्रात बंदी असलेल्या गुटख्याचीही मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खाजगी ट्रॅव्हल्समधून अवैध मालवाहतूक करणाऱ्यांवर प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेमार्फत दंडात्मक व वाहने जप्तीची परिणामकारक कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी खाजगी ट्रॅव्हल्सवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड व पुणे या कार्यालयामार्फत खाजगी प्रवासी बसेसची नियमित तपासणी करण्यात येते. प्रवासी बसमधून माल वाहतूक करत असल्याचे तपासणीमध्ये आढळून आल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येते.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड कार्यालयाच्या वायुवेग पथकांद्वारे दि.०१.०४.२०२४ ते दि.१४.०२.२०२५ या कालावधीमध्ये खाजगी प्रवासी बसमधून अवैध मालवाहतूक करणाऱ्या एकूण १७९ बसेसवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून रु.८,८०,०००/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे कार्यालयाच्या वायुवेग पथकांद्वारे सन २०२३-२०२४ व सन २०२४-२०२५ या कालावधीमध्ये खाजगी प्रवासी बसमधून अवैध मालवाहतूक करणाऱ्या एकूण १५९२ बसेसवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून रु.१,५९,२०,०००/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दुर्गमानवाड व मिसाळवाडी (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथे बेकायदेशीर बॉक्साईट उत्खनन सुरु असल्याबाबत

**(१५) * ४४८४ श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुर्गमानवाड व मिसाळवाडी (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथे बेकायदेशीरित्या बॉक्साईट उत्खनन सुरु असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणच्या उत्खननाबाबत संबंधित विभागाकडे तक्रार केल्यानंतर तात्पुरती दंड आकारणी व कागदोपत्री कारवाई करून पुन्हा अवैध उत्खनन सुरु असल्यामुळे शासनाचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध उत्खनन रोखणे, महसुलाची वसुली करणेसह दोषी कंत्राटदार व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई :** (१) हे खरे नाही.

मौजे दुर्गमानवाड येथील गट क्र.५५५, ५५६ व ५५७ या खाजगी मालकीच्या जमिनींमधील मातीच्या बेकायदेशीर उत्खननावर तहसिलदार, राधानगरी, जि.कोल्हापूर यांच्या मार्फत कारवाई करण्यात आली होती. या दरम्यान, सदर माती बॉक्साईट सदृश असल्याचे प्राथमिक दृष्टया निदर्शनास आल्याने, सदर मातीच्या नमुन्यांचे महासंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर या कार्यालयाकडून रासायनिक पृथ:करण केले असता, त्यामध्ये बॉक्साईट खनिज नसल्याचे निष्पन्न झाले आहे. तर मौजे मिसाळवाडी येथे उत्खनन झाल्याचे तपासाअंती दिसून आलेले नाही.

(२) व (३) अवैध उत्खनन रोखण्यासाठी क्षेत्रियस्तरावर फिरते गस्ती पथके/चौक्या गठीत करुन या पथकांमार्फत अवैध उत्खनन व वाहतूकीवर नियंत्रण ठेवण्यात येत आहे. बेकायदेशीर गौण खनिजाच्या उत्खननाबाबत तहसिलदार, राधानगरी यांनी नियमानुसार दंडात्मक कारवाई करुन संबंधित शेतकऱ्यांकडून रु.१,५७,५८,३००/- (रु.एक कोटी सत्तावन्न लक्ष, अठ्ठावन्न हजार तीनशे फक्त) एवढा दंड प्रस्तावित केला आहे. तसेच, या शेतक-यांना नमुना क्र.४ ची नोटीस बजावून सदर रकमेचा बोजा त्यांच्या मालकीच्या जमीनीचा अधिकार अभिलेखावर नोंद करण्याची कार्यवाही सुरु केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्रातील दस्तऐवज परीक्षण शाखा राज्य गुन्हे अन्वेषण विभागातून मुक्त करून न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या अधिपत्याखाली आणण्याबाबत

**(१६) * ५३३३ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दस्तऐवज परीक्षण शाखा व हस्ताक्षर तज्ञ (Question Documents Examiners or Handwriting Experts) राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या (CID) अधिपत्याखाली कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशातील बहुतांश राज्यांमध्ये दस्तऐवज परीक्षण विभाग, संबंधित राज्यातील न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोग शाळांच्या अधिपत्याखाली कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फौजदारी न्याय प्रक्रीया उत्तम व अधिक गतिशील करण्यासाठी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने सुचविलेल्या शिफारशी नुसार महाराष्ट्रातील दस्तऐवज परीक्षण शाखा राज्य गुन्हे अन्वेषण विभागातून (CID) मुक्त करून 'न्यायसहायक वैज्ञानिक' प्रयोगशाळेच्या अधिपत्त्याखाली आणणे तसेच वाढत्या फौजदारी गुन्ह्यांच्या तुलनेत हस्ताक्षर तज्ञांच्या संख्येत वाढ करणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्रातील दस्तऐवज परीक्षण शाखेकडून 'न्यायसहायक वैज्ञानिक' प्रयोगशाळेत विलीन करण्याची मागणी सातत्याने होत असून समर्थन या संस्थेने यासंदर्भातील निवेदन शासनास सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय. देशातील काही राज्यांमध्ये दस्तऐवज परीक्षण विभाग न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांच्या अधिपत्याखाली कार्यरत आहे.
(३) यासंदर्भात गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या दस्तऐवज परीक्षण शाखेचे न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयामध्ये विलिनीकरण करणेबाबत प्रस्ताव विचाराधीन नाही.
(४) या विषयासंदर्भात समर्थन या संस्थेने शासनास निवेदन सादर केले असल्याचे आढळून येत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती या योजनेच्या लाभार्थी संख्येमध्ये कपात केल्याबाबत

**(१७) * ४९१८ श्री.प्रविण विरभद्रया स्वामी (सर) (उमरगा) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (पी. एचडी. करिता) योजनेंतर्गत सन २०२२-२३ पासून लाभार्थी संख्या व अर्थसहाय्यामध्ये कपात करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर योजनेंतर्गत सन २०२०-२०२१ पासून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती व इतर अर्थसहाय्य विलंबाने वितरीत करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेतील लाभार्थी संख्या आणि अर्थसहाय्यामध्ये कपात करण्याच्या निर्णयाविरोधात महाज्योतीच्या कार्यालयासमोर व अन्य ठिकाणी नागरिक, संस्था, संघटनांनी आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजनेच्या लाभार्थी संख्येत व अर्थसहाय्य रकमेत वाढ करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१), (२), (३) व (४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि.३०.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाज्योती संस्थेमार्फत २०० विद्यार्थ्यांकरीता अधिछात्रवृत्ती योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तथापि, विविध लोकप्रतिनिधी व विद्यार्थी संघटनांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने सदरहू शासन निर्णयामधील निकषांमध्ये दि.२५.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये आवश्यक सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यानुसार दि.३०.१०.२०२३ पूर्वी महाज्योती संस्थामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार प्राप्त अर्जांपैकी पात्र संशोधक विद्यार्थ्यांना सरसकट ५० टक्के दराने अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यात

आली आहे. तसेच, पुढील जाहिरातीपासून महाज्योतीमार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्तीकरीता विद्यार्थी संख्येमध्ये २०० वरून ३०० इतकी वाढ करण्यात आलेली आहे.

तसेच, अधिछात्रवृत्ती योजनांमध्ये एकसमानता राहण्याकरीता दि.११.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार बार्टी व सारथीच्या धर्तीवर महाज्योती संस्थेच्या विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून १०० टक्के अधिछात्रवृत्ती देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

सन २०२०-२०२१ पासून निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी त्यांचा सहामाही संशोधन प्रगती अहवाल महाज्योतीला सादर केल्यानंतर त्यांना नियमित अधिछात्रवृत्ती प्रदान करण्यात येते. त्यानुसार सन २०२१ मधील विद्यार्थ्यांना रू.५९.९८ कोटी, सन २०२२ मधील विद्यार्थ्यांना रू.८३.५६ कोटी व सन २०२३ मधील विद्यार्थ्यांना रू.१२.२७ कोटी असे आतापर्यंत एकूण रू.१५५.८१ कोटी इतका निधी वेळोवेळी वितरीत करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे केडगाव (ता.दौंड, जि.पुणे) येथील शेतकऱ्यांसह राज्यभरातील अनेक शेतकऱ्यांची किसान हॅक या पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या बनावट ॲपद्वारे फसवणूक केल्याबाबत**

**(१८) * ५०८७ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे केडगाव (ता.दौंड, जि.पुणे) येथील शेतकऱ्यांसह राज्यभरातील किसान निधी हॅक या पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या बनावट ॲपद्वारे अनेक शेतकऱ्यांच्या मोबाईलवर PM Kisan list.APL किंवा PM Kisan. APK अशा लिंक पाठविण्यात येत असून त्या लिंक उघडताच बँक खात्यातील रक्कम काढून फसवणूक करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशाच प्रकारच्या इतर शासकीय योजनांची अमिष दाखवून ॲपद्वारे नागरिकांची फसवणूक केल्याप्रकरणी अनेक तक्रारी दाखल करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बनावट ॲपद्वारे होणाऱ्या फसवणूकीस आळा घालणेसह दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे नाही.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या बनावट अँपव्दारे फसवणूक करण्यात आल्याची बाब या कार्यालयाच्या निदर्शनास आलेली नाही. तथापि, अशा स्वरुपाच्या घटना घडल्याच्या बातम्या प्रसार माध्यमामध्ये प्रसिध्द झालेल्या आहेत.
(२) हे खरे नाही.

या प्रकारच्या कोणत्याही तक्रारी कृषि विभागास तसेच गृह विभागास प्राप्त झालेल्या नाहीत.
(३) PM Kisan list. APL. किंवा PM Kisan. APK अशा लिंक, समाज माध्यमांव्दारे पाठविण्यात येत असल्याच्या बातम्या निदर्शनास आल्याने, कृषि आयुक्तालय स्तरावरुन PM Kisan list. APL. किंवा PM Kisan. APK या लिंकचा शेतकऱ्यांनी वापर करु नये, यासाठी स्थानिक पातळीवर विविध माध्यमांव्दारे प्रचार प्रसिध्दी करण्याकरीता सर्व जिल्हयांना निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार वृत्तपत्रातील बातमी, आवाहन पत्र व व्हॉटसॲप ग्रुप वरील संदेश या माध्यमांव्दारे जागरुकता निर्माण करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### करजगी (ता.जत, जि.सांगली) येथील चार वर्षीय चिमुरडीवर अत्याचार करुन खून केल्याबाबत

**(१९)** * **६०६५ श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करजगी (ता.जत, जि.सांगली) येथील चार वर्षीय चिमुरडीवर अत्याचार करून तिचा खून केल्याचे शवविच्छेदन अहवालात माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सदर प्रकरणी न्याय मिळण्याकरिता याबाबतचा खटला हा जलद गती न्यायालयात चालविण्यात यावा अशी मागणी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

विधि व न्याय विभागाच्या दि.१७ मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर खटला जलदगती न्यायालयात चालविण्याकरिता योग्य ती कार्यवाही करणेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांना विनंती करण्यात आली आहे.
(३) सदर प्रकरणी उमदी पोलीस ठाणे, जि. सांगली येथे गु.र.नं.२६/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३(१), २३८, ६५(२), १२७(२) सह लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम कलम ४, ५(आय), ६, ८, १२ अन्वये दि.०६.०२.२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी अटक असून न्यायालयीन कोठडीत आहे. आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### गंगाखेड, पालम व पूर्णा (जि.परभणी) तालुक्यातील गावठाण जमीनीवर सौरउर्जा प्रकल्प उभारण्याबाबत

**(२०)** * **५३४० श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगाखेड, पालम व पूर्णा (जि.परभणी) तालुक्यात सिंचनासाठी मुबलक पाणी उपलब्ध असतानाही शेतकऱ्यांच्या कृषीपंपाला नियमित वीज पुरवठा होत नसल्याने या भागातील शेती सिंचनाखाली येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील कृषीपंप व गावठाणाकरीता नियमीत वीजपुरवठा करण्यात यावा तसेच गावठाण जमीनीवर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये लेखी निवेदनाव्दारे करुनही अद्याप या प्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांच्या कृषीपंपाना नियमित वीज पुरवठा करणे आणि सौरऊर्जा प्रकल्पाची उभारणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. सद्यस्थितीत, वीज भार व्यवस्थापन करण्यासाठी तसेच कृषी पंपांसाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा लक्षात घेऊन मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण राज्यात कृषी वाहिन्यांवरील ग्राहकांना दिवसा ८ तास किंवा रात्री ८ तास थ्री फेज वीजपुरवठा चक्राकार पध्दतीने देण्यात येतो.

(२) हे खरे नाही. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना- २.० अंतर्गत परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यामध्ये ९ उपकेंद्रासाठी ४२ मेगावॅट, पालम तालुक्यामध्ये ४ उपकेंद्रासाठी ३५ मेगावॅट व पूर्णा तालुक्यामध्ये ९ उपकेंद्रासाठी ४२ मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पांचा समावेश असुन सदरची कामे प्रगतिपथावर आहेत.
(३) शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना जाहीर केली आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना- २.० अंतर्गत, एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेड कंपनीतर्फे १५,७०० मेगावॅट क्षमतेकरीता निविदा जाहिर केल्या असून १४,९२६ मेगावॅट क्षमतेसाठी कार्यादेश देण्यात आले आहेत. यामध्ये परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यामधील ९ उपकेंद्रांसाठी ४२ मेगावॅट, पालम तालुक्यामध्ये ४ उपकेंद्रांसाटी ३५ मेगावॅट व पूर्णा तालुक्यामध्ये ९ उपकेंद्रांसाठी ४२ मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पांचा समावेश आहे. सदरील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कार्यादेश दिले आहेत. यानुषंगाने काही ठिकाणी वीज खरेदी करार झाले असून, कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर येथे नवउद्योजकांना उद्योगासाठी परवानगी मिळविण्यासाठी अनेक अडचणीचा सामना करावा लागत असल्याबाबत

**(२१) * ५८७३ श्री.प्रदिप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगरमध्ये नवउद्योजकांना उद्योगासाठी परवानगी मिळविण्यासाठी अनेक अडचणीचा सामना करावा लागत असल्याने तेथील २० पेक्षा अधिक उद्योग गेल्या ६ महिन्यापासून सुमारे ७०० कोटीच्या गुंतवणुकीच्या प्रतिक्षेत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच उपरोक्त उद्योगासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून कन्सेंट टू एस्टॅब्लिशमेंट आणि कन्सेंट टू ऑपरेट या दोन्ही परवानगी मिळत नसल्याने छत्रपती संभाजीनगरचा विकास होत नसल्याची तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त जिल्ह्यातील उद्योगांना चालना देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या तत्परतेने देऊन उद्योग सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) प्रश्नाधीन विषयाबाबतचे वृत्त स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झाले होते.
(२) व (३) प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे संमतीपत्रासाठी प्रलंबित अर्जाच्या अनुषंगाने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडून करण्यात अलेल्या पाहणी दरम्यान काही प्रकरणांमध्ये अनियमितता आढळून आल्याने संबंधित प्रादेशिक अधिकारी व उपप्रादेशिक अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेल्या संमतीपत्र अर्जांचा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत विहीत कालमर्यादेत निपटारा करण्यात येतो.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि.२४/०१/२०२५ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांन्वये उद्योगांना प्रदान करण्यात येणाऱ्या संमतीपत्राच्या मंजुरीचा सादरीकरणाच्या टप्पानिहाय कालावधी विहीत केला असून त्याची अंमलबजावणी करण्याची दक्षता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत घेण्यात येत आहे.

संमतीपत्र अर्ज विहीत मुदतीत निकाली काढण्याच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी तसेच संमतीपत्र अर्ज निकाली प्रक्रियेवर देखरेख ठेवणे व संनियत्रण करणे याकरिता दि.०७/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य स्तरावरील सनियंत्रण समिती गठित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**टेंभूर्णी (ता.माढा, जि.सोलापूर) परिसरात मोठया प्रमाणात अवैध धंदे सुरु असल्याबाबत**

**(२२) * ४६७३ श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंभूर्णी (ता.माढा, जि.सोलापूर) परिसरात मोठया प्रमाणात अवैध धंदे सुरु असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माढा तालुक्यातील या गावामध्ये मोठी बाजारपेठ तसेच पोलीस खात्याचे एक आऊट पोस्ट कार्यरत आहे, तसेच याच टेंभूर्णी गावातून पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा या शहराला जोडणाऱ्या पुणे-सोलापूर या महामार्गावर श्री क्षेत्र पंढरपूर येथे यात्रा कालावधीत जाणाऱ्या दिंड्या व पालख्या येत असल्याने भाविकांना याचा त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अवैध धंदे तात्काळ बंद करण्याबाबत नागरिकांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने उक्त ठिकाणी सुरु असलेल्या अवैध धंदयाविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सन २०२५ मध्ये टेंभूर्णी पोलीस ठाणे हद्दीमध्ये अवैध धंद्यांबाबत एकूण ४८ प्रकरणे निदर्शनास आली आहेत.

(२) हे अंशतः खरे आहे.

सोलापूर ते पुणे महामार्गावर टेंभूर्णी पोलीस ठाणे हद्दीमध्ये मोडनिंब गावात मोडनिंब हे दूरक्षेत्र कार्यरत असून यामध्ये एकूण ०८ गावांचा समावेश होतो. तसेच श्री क्षेत्र पंढरपूर येथे यात्रा कालावधीत जाणाऱ्या वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून पोलीस प्रशासन व सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडून वारकऱ्यांची योग्य ती सोय केली जात असून पालखीच्या मुक्कामाच्या ठिकाणी स्वतंत्ररित्या पोलीसांची गस्त ठेवण्यात येते. त्यामुळे अद्यापपर्यंत भाविकांची कोणतीही गैरसोय झालेली नसून कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण झालेला नाही

(३) हे खरे नाही.

सदर प्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाणे येथे नागरिकांकडून कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(४) फेब्रुवारी २०२५ पर्यंत टेंभूर्णी पोलीस ठाणे हद्दीत अवैध धंद्यांवर खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे:-

| | **जुगार** | **दारुबंदी** | **वाळूतस्करी** |
|---|---|---|---|
| **प्रकरणे** | ०९ | ३३ | ०६ |
| **जप्तमाल(रु.)** | ३,८९० | १,३७,४६० | १,१५,५०० |

तसेच सन २०२५ मध्ये अवैध धंद्यांवर भा.ना.सु.सं. कलम १२६ अन्वये १७५, भा.ना.सु.सं. कलम १२९ अन्वये ३७, प्रतिबंधात्मक कायदा कलम ९३ अन्वये ०६ अशा एकूण २१८ प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतात लावण्यात आलेल्या सी.आर.आय. कपंनीच्या कृषी सोलर पंपाच्या तक्रारीबाबत

**(२३)** * **४८१० श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या शेतात सी.आर.आय. कपंनीमार्फत बसविण्यात आलेल्या ३०७ सौर कृषीपंपाबाबत अनेक तक्रारी मंडळ कार्यालयाकडे प्राप्त झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारी मंडळ कार्यालयाकडून सी.आर.आय. कंपनीकडे वर्ग करण्यात येऊनही तक्रारी सोडविण्याबाबत कंपनीकडून योग्य प्रतिसाद मिळत नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंपनीच्या गैरवतणूकीची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी विभागीय कार्यालयाकडे दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजीच्या सुमारास करुनही अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कृषीपंपाच्या तक्रारी तातडीने निकाली काढणेसह याकडे दुर्लक्ष करणाऱ्या कंपनीच्या अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

चंद्रपूर मंडळांतर्गत शेतकऱ्यांच्या शेतात सी. आर. आय. कंपनीने मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना टप्पा- १ व मुख्यमंत्री सौर कृषीपंप टप्पा -२ आणि कुसुम -ब असे एकुण ३०९ सौर कृषीपंप आस्थापित केले आहेत.

सी. आर. आय. कंपनीच्या कृषीपंप सोलर पंपाच्या एकुण १५ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्या तात्काळ सी.आर.आय कंपनीकडे वर्ग करण्यात आल्या आहेत. सदर तक्रारीपैकी एकुण ०४ तक्रारींचे कंपनीकडून निराकरण करण्यात आले असून उर्वरित प्रलंबित तक्रारी सोडवून शेतकऱ्यांचे सौर कृषीपंप चालु करण्याकरीता महावितरणमार्फत कंपनीच्या प्रतिनिधीशी संपर्क साधून प्रलंबित तक्रारीचे निराकरण करण्यासाठी सतत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) व (४) सी.आर.आय. कंपनीमार्फत उर्वरीत ११ तक्रारीचे निराकरण कंपनीकडून अद्यापही करण्यात आले नसून, त्यासाठी सदर कंपनीच्या नियमाप्रमाणे निविदेच्या सेक्शन-७, कलम ३ नुसार, टेंडर क्र. २ व ३ नुसार सौरपंप नादुरुस्त झाल्यानंतर विहित वेळेत दुरुस्त न केल्यामुळे पहिल्या ७ दिवसाकरीता रु १००/- प्रतिदिवस व त्यानंतर सौरपंप कार्यान्वित करेपर्यंत प्रतिदिवस रु.५००/- प्रमाणे दंड आकारण्याचे नमुद केले आहे. त्यानुसार सी.आर. आय. कंपनीस सौरपंप कार्यान्वित न केल्यामुळे एकूण रु १३,५०,५००/- इतकी दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. सी.आर.आय. कंपनीकडे केलेल्या सततच्या पाठपुराव्यानंतर दिनांक ०४.०३.२०२५ पर्यंत ७ लाभार्थ्यांकडे आवश्यक असलेले सौरपॅनल तसेच मोटार इ. साहित्य पोहचविण्यात आले असून, लवकरच उर्वरित सौरपंप कार्यान्वित करण्याचे कंपनीने आश्वासीत केले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात परिवहन विभागाने तीन कंपन्यांना चढ्या दराने एचएसआरपी नंबर प्लेट लावण्याचे कंत्राट दिल्याबाबत

**(२४)** * **५९ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.प्रविण विरभद्रया स्वामी (सर) (उमरगा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१९ पूर्वी नोंदणीकृत वाहनांना दिनांक ३१ मार्च, २०२५ पूर्वी उच्च सुरक्षित नंबर प्लेट बसविणे अनिवार्य करण्यात आले असून त्याकरिता तीन कंपन्यांची निवड करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिवहन विभागाने तीन कंपन्यांना चढ्या दराने एचएसआरपी नंबर प्लेट लावण्याचे कंत्राट दिल्यामुळे दुचाकी मालकांना भुर्दंड सहन करावा लागणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील वाहनांची संख्या पाहता वरील मुदतीत सर्व वाहनांना नंबर प्लेट बसविणे शक्य नसल्याने याबाबत मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव विभागाच्या विचाराधीन आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) होय.
(२), (३) व (४) दिनांक ०१.०४.२०१९ पुर्वी नोंदणी झालेल्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (एचएसआरपी) बसविण्याकरिता घटकांची निवड निविदा प्रक्रियेद्वारे करण्यात आली आहे. उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (एचएसआरपी) बाबतचे महाराष्ट्र राज्यातील दर निश्चित करताना अन्य राज्यामधील दरांचा आधार घेण्यात आला आहे. उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (एचएसआरपी) बाबतचे महाराष्ट्र राज्यातील दर खालील प्रमाणे आहेत :-

| **अ.क्र.** | **वाहनाचा प्रकार** | **महाराष्ट्र राज्यातील एचएसआरपीचे दर (जीएसटी वगळून)** |
|---|---|---|
| १ | दोन चाकी वाहने | रू. ४५०.००/- |
| २ | तीन चाकी वाहने | रू. ५००.००/- |
| ३ | चार चाकी वाहने | रू. ७४५.००/- |
| ४ | जड वाहने | रू. ७४५.००/- |

उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (एचएसआरपी) बसविण्यासाठी निवड करण्यात आलेल्या ३ घटकांना परिवहन आयुक्त यांच्याकडून उद्देशिय पत्र (एलओआय) देण्यात आले असून सदर कंपन्यांसमवेत करार करण्यात आला आहे. तसेच याबाबतची मानक कार्यप्रणाली (एसओपी) देखील निर्गमित करण्यात आली आहे. विहित कालमर्यादेमध्ये वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (एचएसआरपी) बसविण्याबाबतची कार्यवाही राज्यामध्ये सुरु असून कालमर्यादेमध्ये कार्यवाही करण्याबाबत संबंधित घटकांना सूचित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दापोडी (जि.पुणे) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यशाळेत भांडार खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(२५) * ६५२० श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापोडी (जि.पुणे) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यशाळेत भांडार खरेदीत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गैरव्यवहाराचे शासनाकडून विशेष लेखापरीक्षण करण्याची मागणी भारतीय दलित पँथरने गत चार वर्षापूर्वी करुनही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कार्यशाळेत गैरव्यवहार कालावधीत कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची बेहिशोबी मालमत्ता प्रकरणी ए.सी.बी. मार्फत चौकशी सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन खरेदी प्रकरणाचे विशेष लेखापरीक्षण करणेसह यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१), (२), (३), (४) व (५) रा.प दापोडी, जि.पुणे येथील एस.टी.महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यशाळेत झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी दलित पँथरने केलेल्या मागणीच्या अनुषंगाने लेखा परिक्षण करण्यात आले. त्यामध्ये अनियमीतता झाल्याची बाब दिसून आली. त्यामधील संबधीतांविरुद्ध प्रमादिय कार्यवाही केली आहे.

तसेच श्रीमती प्रियदर्शिनी वाघ, तत्का.भांडार अधिकारी यांचे बाबतीत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा  यांच्या मागणी नुसार मत्ता व दायीत्वाचा सिल बंद लिफाफा देण्यात आला आहे.

-----------------

## राज्यात प्लॅस्टिक बंदी करण्याबाबत

**(२६) * १४७२ श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्लॅस्टिक बंदी असल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्लॅस्टिकच्या एकल वापराबाबत कारवाई करुन १४.५० टन एकल वापर प्लॅस्टिक जप्त केल्याचे दिनांक २८ जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात प्लॅस्टिक वापरावर बंदी असतानाही अनेक कंपन्या, गोदामे, दुकानांमार्फत प्लॅस्टिकचे उत्पादन व विक्री केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) त्यामुळे कॅन्सरसारख्या आजाराला कारणीभूत ठरत असलेल्या चहाच्या कागदी कपावर बंदी घालण्याबाबतची मागणी परभणी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकाऱ्यांकडे आणि हिंगोली नगरपालिकेकडून प्लॅस्टिक बंदी करण्यात यावी अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच हिंगोली जिल्ह्यात कोरोना संसर्ग रोगापासून अति वापरण्यात आलेल्या डिस्पोजेल किंवा प्लॅस्टिक कपचा सर्रास वापर होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, परभणी यांनी सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांना दिनांक ३० डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने राज्यात प्लॅस्टिक बंदी करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून एकल वापर प्लॅस्टिकचे उत्पादन करण्याकरीता उद्योगास संमतीपत्र दिले जात नाही. तथापि, एकल वापर प्लॅस्टिकच्या वस्तु, उत्पादन, विक्री करणाऱ्या दुकानांवर तसेच साठवणूक करणाऱ्या गोदामावर महाराष्ट्र प्लॅस्टिक व थर्माकॉल अधिसूचना, २०१८ प्रमाणे कारवाई केली जाते.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) हे खरे आहे.

(६) महाराष्ट्र प्लॅस्टिक व थर्माकॉल अविघटनशील वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना, २०१८, दिनांक २३ मार्च, २०१८ व सुधारित अधिसूचना दिनांक १५.०७.२०२२ नुसार राज्यामध्ये प्लॅस्टिक लेपित तसेच प्लास्टिक थर असणाऱ्या पेपर / ॲल्युमिनियम इ. पासून बनविलेल्या डिस्पोजेबल डिश, कप, प्लेट्स, ग्लासेस, काटा, वाडगा, कंटेनर इ. एकल वापर उत्पादनावर बंदी घालण्यात आली आहे. तथापि, एकल वापर प्लॅस्टिकच्या वस्तु, उत्पादन, विक्री करणाऱ्या दुकानांवर तसेच साठवणूक करणाऱ्या गोदामावर महाराष्ट्र प्लॅस्टिक व थर्माकॉल अधिसूचना, २०१८ प्रमाणे कारवाई केली जाते.

सहाय्यक आयुक्त, अन्न व औषधे प्रशासन, परभणी यांनी दिनांक ३१.०१.२०२५ रोजी जिल्हाधिकारी यांना अहवाल सादर केला असून, अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ व त्याअंतर्गत नियम व नियमन-२०११ नुसार अन्नपदार्थ पॅकींगसाठी किंवा ग्राहकांना सेवनासाठी देतांना वापरात येणारे व अन्न पदार्थाच्या प्रत्यक्ष संपर्कात येणारे कागद अथवा प्लॅस्टिक हे फुडग्रेड असणे आवश्यक आहे. तसेच, सिंगल युज प्लॅस्टिकचा वापर न करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.

परभणी जिल्हयामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत मागील २ वर्षामध्ये ८१ आस्थापनांवर कारवाई करण्यात आली असून, रु. ४,२०,८००/- इतका दंड वसुल करण्यात आला आहे.

तसेच, हिंगोली जिल्हयामध्ये नगर परिषद, हिंगोली यांच्याकडून झोन निहाय पथके गठीत करुन, प्लॅस्टिक वापर करणाऱ्या आस्थापनांवर दंडात्मक व प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या अंतर्गत असणाऱ्या मे.सार.आय.टी. रिर्सोसेस प्रा.लि. या कंपनीने केलेल्या कामाचे लेखा परिक्षणात त्रुटी व आक्षेप नोंदविण्यात आल्याबाबत**

**(२७) * ३२१६ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या अंतर्गत असणाऱ्या मंदिराची मालमत्ता, जमिनीचा बदल याबाबत विस्तृत सर्वेक्षण करणे तसेच देवस्थान समितीला आवश्यक असणारी ९ सॉफ्टवेअर देण्यासाठी नियुक्त केलेल्या मे.सार.आय.टी.रिर्सोसेस प्रा.लि. कंपनीने सदरहू काम वारंवार मुदतवाढ देऊनही अद्यापपर्यंत पूर्ण केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कंपनी व देवस्थान समिती पदाधिकारी यांच्यात कामासंदर्भात एकही बैठक न होणे, १४०० मंदिराबाबतचा अहवाल संपूर्णपणे सदोष असणे, वारंवार मुदतवाढ देऊन सुद्धा काम पूर्ण झाले नसल्याबाबत कंपनीला विचारणा न करणे, कंपनीवर दंडात्मक कारवाई न करणे, कामाचा हेतू साध्य न होणे इ. अनेक आक्षेप देवस्थान समितीच्या अंतर्गत लेखापरिक्षणात नोंदविण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असे असतानाही देवस्थान समितीने दिनांक ३१ मार्च, २०२३ अखेर सदरहू कंपनीला २ कोटी १९ लाख ९३ हजार इतकी रक्कम अदा केल्याबाबतचे आक्षेप देखील सदर लेखापरिक्षणात नोंदविण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित कंपनी व यातील दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

देवस्थान जमिनीचा व मंदिराचा सर्व्हेचे प्रत्यक्ष कामकाज माहे फेब्रुवारी २०२० पासून सुरु झाले होते. मार्च

२०२० पासून कोरोना विषाणू संसर्गामुळे संपूर्ण देशात लॉकडाऊन (टाळेबंदी) जाहीर झाल्यामुळे कंपनीस मंदिरे खुली होईपर्यंत सर्व्हेचे काम करता आले नाही. टाळेबंदी उठल्यानंतर बऱ्याच ठिकाणी रुग्णसंख्या जास्त असल्यामुळे बाहेरील व्यक्तींना गावामध्ये प्रवेश नसल्याने डिसेंबर २०२१ अखेर पर्यंत सर्व्हेचे काम पूर्ण करता आले नाही. तरी या कालावधीमध्ये ज्या गावामध्ये लॉकडाऊन शिथील झालेला आहे त्या गावातील मंदिराचा व जमिनीचा अशा एकूण १२०० मंदिराचा सर्व्हे पुर्ण करून घेण्यात आलेला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

अंतर्गत लेखापरिक्षणात आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. परंतु मे.सार. आय.टी.रिर्सोसेस प्रा.लि. व देवस्थान समितीच्या पदाधिकाऱ्यांमध्ये सर्व्हे कामकाजाच्या आढावा बैठका वेळोवेळी झालेल्या आहेत. तसेच १४०० मंदिरा बाबत अहवाल सपूर्ण सदोष नाहीत. काही मंदिराबाबत सन १९६० पासुन चे ७/१२ उतारे, इनाम पत्रक, गट नकाशे उपलब्ध न होणे अशा प्रकारच्या तांत्रीक त्रुटी आहेत. सर्व्हे कामकाजाबाबत देवस्थान समितीकडून वारंवार पाठपुरावा करून कंपनीकडून ३०६७ पैकी २६०० मंदिराचा सर्व्हे पूर्ण करुन घेण्यात आलेला आहे. तसेच या कामासाठी झालेल्या विलंबामुळे कंपनीने त्यानंतर मुदतवाढीसह सादर केलेल्या बिलाच्या रक्कमेवर ५% दंड वसुल करणेत आलेला आहे.

सर्व्हे कामाकाजामध्ये विलंब होण्यास प्रमुख कारण म्हणजे सन १९६० पासूनचे ७/१२ उतारे संबंधित तहसिल कार्यालयाकडून प्राप्त होण्यास उशिर होणे, लागणदार व वहिवाटदार शेतकरी हे सर्व्हेवेळी उपस्थित नसणे यामुळे सर्व्हे पूर्ण होण्यास विलंब होत आहे. सर्व्हेमुळे लागणदार शेतकरी यांनी केलेली शर्तभंग, अतिक्रमणे व संपादन झालेल्या जमीनीची माहिती सर्व्हेचे कामातून उपलब्ध होत असून ज्या शेतकऱ्यांची लागण रक्कम प्रलंबित होती ती वसुल होण्यास मदत होत आहे. सर्व्हे कालावधीत देवस्थान समितीकडे खालील प्रमाणे वाढीव लागण रक्कम जमा झालेली दिसुन येत आहे.

| सन | लागण रक्कम जमा |
|---|---|
| २०२०/२१ | रु.१४,७१,६७१/- |
| २०२१/२२ | रु.३६,२६,१९३/- |
| २०२२/२३ | रु.२६,३०,१२४/- |
| २०२३/२४ | रु.६१,३७,४२०/- |
| फेब्रुवारी २५ अखेर | रु.५२,५१,७८९/- |

तसेच चालु असलेल्या सर्व्हेमध्ये देवस्थान समितीस ४२७.६६ हे.आर इतकी जादा जमिन प्राप्त झालेली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

देवस्थान समितीकडील सन २०२२/२३ मधील अंतर्गत लेखापरिक्षणात सदरचा आक्षेप नोंदविणेत आलेला आहे. सन २०२१/२२ मध्ये देयक रक्कम अदा केल्यानंतर १ जुलै, २०२४ रोजी सन २०२२/२३ चा अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल या कार्यालयाकडे प्राप्त झाला आहे.

सदरहू कंपनीला या कार्यालयाकडुन प्रत्येक २०० मंदिराकरीता एक देयक असे एकूण १२०० मंदिराचे सर्व्हे कामाचे सहा देयकांची रक्कम आदा केली आहे. सदर रक्कम ही कंपनीसोबत झालेल्या करारात नमुद केलेल्या अटीशर्तीनुसार केवळ पूर्ण झालेल्या कामाबाबत कंपनीने सादर केलेल्या देयकापैकी ८५ % रक्कम अदा करुन उर्वरित १५% रक्कम त्रुटी पूर्ततेनंतर अदा करण्याकरीता राखून ठेवली आहे.

(४) विधि व न्याय विभाग, अधिसूचना दिनांक ०२ मे १९६९ अन्वये पश्चिम महाराष्ट्राकरीता नेमण्यात आलेल्या देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर या समितीकडे दिनांक १४ मे १९६९ चे अनुसूचीतील ३०६७ मंदिरे त्यांच्या स्थायीदाने / जंगम व स्थावर मिळकतींसह मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ५६(ड) नुसार व्यवस्थेसाठी हस्तांतरण करण्यात आलेली आहेत. त्यानुसार सदर मंदिरांचे कामकाज समिती पहाते.

देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर चे अधिनस्त जमीनीचे सुयोग्य व्यवस्थापन व सदर जमीनींचा ताळमेळ घेणे यासाठी सन २०१४ मध्ये विधि व न्याय विभागामार्फत करण्यात आलेल्या कार्यालय निरीक्षण अहवालामध्ये सर्व्हे व सॉफ्टवेअर बाबत सूचित करण्यात आले होते.

महाराष्ट्र विधानमंडळ सन २०१७ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात मा.श्री प्रकाश आबिटकर आणि इतर विसस यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान मा.डॉ.रणजीत पाटील, मा.राज्यमंत्री (विधि व न्याय) यांनी “साधरणत: २५९०० हे. जमीन आपण लिलावाद्वारे देतो. ही जमीन सन १९६९ च्या आधी त्या लोकांकडे लिलावाद्वारे दिलेली आहे. तरीही मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, याबाबत माहिती निश्चित पणे घेवून ती पटलावरती ठेवण्यात येईल असे अश्वासन क्रमांक ८० दिलेले आहे. सदर अश्वासनांपूर्ततेच्या अनुषंगाने समितीकडे सातत्याने पत्रव्यवहार / पाठपुरावा करुन जमीनीच्या सर्व्हेचे काम विहित कालमर्यादा देवून पूर्ण करण्याबाबत शासनस्तरावरून कळविण्यात आले आहे.

(५) फेब्रुवारी, २०२० मध्ये प्रत्यक्ष सर्व्हे कामकाज सुरू झाले नंतर कोरोना लॉकडाऊन व २०२१ मधील महापुराचा कालावधी, सन १९६० पासुन चे ७/१२ उतारे, इनाम पत्रक, गट नकाशे उपलब्ध न होणे, लागणदार व वहिवाटदार शेतकरी हे सर्व्हेवेळी उपस्थित नसणे इत्यादी तांत्रिक कारणास्तव विलंब झालेला आहे.

-----------------

## उभळे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील चिरेखाणीमध्ये घातक रसायन भरलेल्या गोणी आढळून आल्याबाबत

**(२८)** * **२९५ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उभळे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील चिरेखाणीमध्ये घातक रसायन भरलेल्या हजारो गोणी आढळून आल्याचे दिनांक ११ जून, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रसायन मिश्रित गोणी तेथे कोणी टाकल्या, त्या कोठून आणल्या होत्या याबाबतचा तपास अदयापपर्यंत झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) दैनिक तरुण भारत मधील वृत्ताच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक १२.०६.२०२४ रोजी प्रत्यक्ष स्थळाची पहाणी केली असता सदर चिरेखाणी उभळे गावापासून अंदाजे दिड ते दोन कि.मी. अंतरावर आहे. त्यानुसार, एम.आय.डी.सी., लोटे येथील ०६ उद्योगांची तपासणी केली असता, मे. रिव्हरसाईड इंडस्ट्रीज लि., प्लॉट नं. बी. ६, एम.आय.डी.सी., लोटे या उद्योगाने घातक घनकचरा अनधिकृतपणे उभळे गावातील चिरेखाणीमध्ये उघडयावर टाकल्यामुळे सदर उद्योगाची रु. ५.०० लक्ष ची बँक हमी जप्त करुन

उद्योगास दिनांक १०.०७.२०२४ रोजी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत बंदची नोटीस देऊन कारवाई करण्यात आली आहे. त्यानुसार, मे. रिव्हरसाईड इंडस्ट्रीज लि. उद्योगाने उभळे येथील एकूण २३.१३० मे. टन इतका घातक घनकचरा उचलुन त्याची विल्हेवाट मे. मुंबई वेस्ट मॅनेजमेंट, तळोजा येथे केलेली आहे.

तद्नंतर मे. रिव्हरसाईड इंडस्ट्रीज लि. उद्योगाने सादर केलेल्या अनुपालन अहवालानुसार सदर उद्योगास दिनांक ०५.०८.२०२४ रोजी सर्शत पुनश्च: उत्पादन सुरु करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात दलालांमार्फत नियमबाह्य कामे केल्याबाबत

**(२९) * ४६१२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती उपप्रादेशिक परिवहन विभागातील श्री.राजकुमार वर्धेकर (बागडी), उपप्रादेशिक परिवहन अधिकारी व दलाल यांनी संगनमताने गैरव्यवहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नियमबाह्य कामांबाबत गाडगेनगर पोलिस स्टेशन येथे गुन्हेगारी स्वरुपाचा कट व फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाचा तपास संथगतीने सुरु असून अद्यापही दोषींना अटक करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असे असतानाही श्री.वर्धेकर यांनी सेवानिवृत्त झाल्यानंतर १७ महिन्यांच्या कालखंडात दलालाच्या संगनमताने नियमबाहय कामे करून शासनाची पुन्हा फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन यातील सर्व दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१), (२), (३), (४) व (५) श्री.राजकुमार वर्धेकर, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी त्यांच्या जन्मतारखेबाबत सेवापुस्तकात खाडाखोड तसेच बनावट कागदपत्रे सादर करुन शासनाची आर्थिक फसवणूक व दिशाभूल केल्याचे निदर्शनास आल्याने शासन निर्णय दिनांक १६.०८.२०२४ अन्वये त्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत. तसेच यासंदर्भात त्यांचेविरुध्द दिनांक २३.०८.२०२४ रोजी पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती शहर येथे भारतीय दंड विधान कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब), ३४ अन्वये गुन्हा क्रमांक ६९५/२०२४ नोंदविण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीसांनी त्यांना दिनांक १८.०३.२०२५ रोजी ताब्यात घेतले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## यवतमाळ जिल्हयात वीज शुल्कापोटी केली जाणारी जादाची वसूली रोखण्याबाबत

**(३०) * ५२१२ श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात महावितरणाकडून दर महिन्याला येणाऱ्या वीज देयकात तुटीच्या नावाने ग्राहकांकडून अवाजवी वीज शुल्क वसूल केले जात असून विजेचा वापर कमी असतानाही सामान्य ग्राहकांना जादाची देयके देण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक वीज देयकामध्ये ग्राहकाकडून १६ टक्के अवाजवी वीज शुल्क वसूल केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवाजवी वीज शुल्क वसूली रोखण्यासह यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ मधील तरतूदींच्या अनुषंगाने ऊर्जा विभागाने दि.२१.१०.२०१६ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार निवासी प्रशुल्क प्रवर्गासाठी वीज वापर आकाराच्या १६% दराने विद्युत शुल्काची आकारणी करण्यात येते.
(२) ऊर्जा विभागाच्या दि.२१.१०.२०१६ रोजीच्या अधिसूचनेनुसार निवासी प्रशुल्क प्रवर्गासाठी १६% दराने विद्युत शुल्काची आकारणी करण्यात येते.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथे प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण निधी योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना डीबीटी तत्वावर दहा कोटींच्या सायकली वाटप करण्याबाबत

**(३१) * १८४८ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण निधी योजनेंतर्गत जिल्हा परिषदेच्या शाळांतील २० हजार विद्यार्थ्यांना डीबीटी तत्वावर दहा कोटी रुपयांच्या सायकली वाटप करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात पाच कोटी रुपयांच्या सायकलचे वाटप करण्याच्या प्रस्तावास मागील दोन महिन्यांपासून शासनाची मान्यता मिळाली नसल्याने नागपूर जिल्हा परिषद शाळांतील गरजू विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई :** (१) होय हे खरे आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांनी दि. १४/०८/२०२४ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर यांचेकडे प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना सन २०२४-२५ अंतर्गत नागपूर जिल्हयातील जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता ५ वी ते १२ वी मुलांना/मुलींना तसेच शासकीय शाळा/शासकीय अनुदानित शाळा यांना सायकल वाटपाकरीता रू.५.०० कोटी एवढा निधी उपलब्ध करून देणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे.
(२), (३) व (४) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडून जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर यांचेकडे दि. २१/०८/२०२४ रोजी प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावाच्या मान्यतेसाठी आवश्यक तांत्रिक मान्यता आदेश तसेच बाधित व अबाधित क्षेत्रनिहाय शाळांची यादी जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडून

दि.२७.०२.२०२५ रोजी प्राप्त झाली असुन त्यानुसार जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर यांच्याकडून प्रशासकीय मान्यता देण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**राज्यात रेडिमिक्स सिमेंट कारखान्यातून होणारे प्रदूषण रोखण्याबाबत**

**(३२) * ३२२३ श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.राजेंद्र गावित (पालघर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पुणे तसेच वसई-विरार (जि.पालघर) येथे अनेक ठिकाणी सुरु असलेले सिमेंट कारखाने व रेडिमिक्स क्राँक्रीट प्लान्ट व त्या माध्यमातून होणाऱ्या सिमेंटच्या वाहतूकीमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कारखान्यांमधून प्रदूषण नियंत्रणाच्या कोणत्याही नियमावलीचे पालन होत नसून या ठिकाणी प्रदूषण रोखण्यासाठी कोणतीही यंत्रणा कार्यान्वित नसल्यामुळे तसेच प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे यांचेवर कोणतेही नियंत्रण नसल्यामुळे परिसरात धुळीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रेडिमिक्स सिमेंट कारखाने व त्यांच्या वाहतुकीसाठी नवीन मार्गदर्शक सूचना व उपाययोजना निश्चित करण्यात आल्या असूनही त्या नियमांचे उल्लघंन होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित रेडिमिक्स क्राँक्रीट प्लान्टला प्रदुषण महामंडळाच्या नियमावलीकडे दुर्लक्ष करणाऱ्या १२ प्लांटला नोटीस बजावल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन रेडिमिक्स सिमेंट कारखान्यातून होणारे प्रदूषण रोखण्याबाबत तसेच दोषी कारखाने व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.

तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून वेळोवळी केलेल्या पाहणीनुसार वसई तालुक्यातील एकूण १६ रेडिमिक्स क्राँक्रीट उद्योगांना कारखाने बंद करण्याचे आदेश तसेच, पुणे, पिंपरी, चिंचवड शहरातील एकूण ४२ उद्योगांवर नियमानुसार प्रस्तावित आदेश, अंतरिम आदेश, उत्पादन बंदचे आदेश देण्यात आलेले आहेत.
(३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) क्षेत्रामध्ये नवीन तसेच अस्तित्वातील रेडीमिक्स क्राँक्रीट उद्योग उभारणीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फ़त दि.२७/११/२०२४ रोजी नवीन धोरण तयार करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी सुरु आहे.
(४) अंशत: खरे आहे.

पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत रेडिमिक्स क्राँक्रीट प्लान्टच्या अनधिकृत बांधकामासंदर्भात नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.
(५) रेडीमिक्स सिमेंट कारखान्यांकडून होणारे प्रदूषण रोखण्याकरीता मंडळाकडून तपासणी करुन वेळोवेळी नियमानुसार कारवाई करण्यात येते.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील निरामय रुग्णालय सुरु करण्याबाबत

**(३३) * ३४३ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील तत्कालिन दाभोळ वीज कंपनीने (एन्रॉन) प्रकल्पग्रस्त आणि या भागातील जनतेला आरोग्य सुविधा देण्यासाठी सुरू केलेले निरामय रुग्णालय वीज कंपनी बंद पडल्यापासून बंद ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुक्यातील वाढती लोकसंख्या व अपूरी आरोग्य सेवा यामुळे सदर रुग्णालय पुन्हा सुरु करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी व जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्यात दि.३१ डिसेंबर, २०२४ रोजी बैठक पार पडली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी बैठकीच्या अनुषंगाने दिलेल्या आश्वासनानुसार या प्रकरणी त्वरीत कार्यवाही करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०२५ च्या सुमारास लेखी निवदेन देऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन निरामय रुग्णालय सत्वर सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) गुहागर (जि. रत्नागिरी) तालुक्यातील तत्कालीन दाभोळ वीज कंपनीने (एन्रॉन) प्रकल्पगस्त आणि त्या भागातील जनतेला आरोग्य सुविधा देण्यासाठी सुरु केलेले निरामय रुग्णालय वीज कंपनी बंद पडल्यापासून बंद ठेवण्यात आले आहे. परंतू गुहागर तालुक्यामध्ये १ ग्रामीण रुग्णालय व ५ प्राथमिक आरोग्य केंद्रे ३० उपकेंद्रे कार्यरत आहेत. तसेच हिंदू हृदयसम्राट आपला दवाखाना (एचबीटी) २ रुग्णालये सुरु आहेत.
(२) गुहागर तालुक्यातील वाढती लोकसंख्या व अपुरी आरोग्य सेवा यामुळे सदर रुग्णालय पुन्हा सुरु करण्यासंदर्भात श्री.भास्कर जाधव, विधानसभा सदस्य, स्थानिक लोकप्रतिनिधी व जिल्हाधिकारी यांचेसोवत दिनांक ३१ डिसेंबर २०२४ रोजी मा. जिल्हाधिकारी यांचे कार्यालयामध्ये बैठक घेण्यात आली आहे.
(३) जिल्हाधिकारी यांचेसोवत दिनांक ३१ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीतील चर्चेनंतर दिनांक १४ जानेवारी २०२५ रोजी जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी, वैद्यकीय अधिक्षक, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी संयुक्तपणे निरामय रुग्णालय गुहागर येथे भेट देवून रुग्णालयीन इमारतीची पाहणी केलेली आहे.
सदर इमारतीची दुरुस्ती, तसेच साहित्य, साधनसामुग्री व पायाभुत सुविधा आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.
(४) जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांनी दिनांक १७.३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये निरामय रुग्णालय सुरु करण्याबाबत व आवश्यक साधनसामुग्री व पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर यांना विनंती केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आलापल्ली (जि.गडचिरोली) येथे वनविभागाच्या अधिकाऱ्यांचा धाक दाखवून लाच मागितल्याबाबत

**(३४) * ४९९८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आलापल्ली (जि.गडचिरोली) येथे शासकीय योजनेतील घरकुलाच्या बांधकामाकरिता विटा बनविण्यासाठी वनपरिक्षेत्रातील नाल्यातून ट्रॅक्टरमध्ये माती भरत असताना, सदर प्रकरणी कारवाई न करण्यासाठी वनपालाने

संबंधिताकडून १ लाख १० हजार रुपयांची मागणी करुन त्यातील ८३ हजार रुपये आरएफओच्या दालनात स्वीकारताना वनपालास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात गैरप्रकार सुरु असताना देखील संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) I. तक्रारदार यांना शासकीय योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या घरकुलाच्या बांधकामाकरिता विटा बनविण्यासाठी वनपरिक्षेत्रातील नाल्यातून ट्रॅक्टरमध्ये माती भरत असताना कारवाई न करण्यासाठी आलोसे क्र.१, वनपाल, उपक्षेत्र तानबोडी, वनपरिक्षेत्र कार्यालय, आलापल्ली यांना तक्रारदार यांचेकडून १,१०,०००/- रूपयेची मागणी करुन त्यातील ८३,०००/- रुपये व दंडाच्या पावतीसह १७,०००/- रुपये असे रु.१,००,०००/- इतकी रक्कम स्विकारतांना वनपरिक्षेत्र कार्यालय आलापल्ली येथे रंगेहाथ पकडण्यात आले आहे तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी क्र. २, वनपरिक्षेत्र अधिकारी, आलापल्ली कार्यालय व आरोपी क्र.३ वनरक्षक, फिरते वनसंरक्षण पथक वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, आलापल्ली यांनी लाच मागणीस व सापळा कारवाई दरम्यान प्रत्यक्ष हजर राहुन प्रोत्साहन दिल्यामुळे तिन्ही आरोपी लोकसेवक यांच्याविरुध्द पो.स्टे. अहेरी येथे अप.क्र ३४/२०२५ कलम ७, ७अ, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये दिनाक ०९.०२.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

II. सदर गुन्ह्यांचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरु आहे.

(३) सदर प्रकरणी, प्रादेशिक व्यवस्थापक, चंद्रपूर प्रदेश, चंद्रपूर यांच्या दिनांक १२.०२.२०२५ च्या आदेशान्वये तिन्ही आरोपी लोकसेवकांना निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई-विरार (जि.पालघर) येथील नगररचना विभागातील उपसंचालक यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३५)** * **३८६७ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) येथील नगररचना विभागातील उपसंचालक, श्री.वाय शिवारेड्डी यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत तत्कालीन गटनेता यांनी विरार पोलीस स्टेशनमध्ये अनेक पुराव्यासह लेखी तक्रार केली असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी केलेल्या तक्रारीकडे संबंधित अधिकाऱ्यांनी अक्षम्य दुर्लक्ष केलेले असून, पोलीस स्टेशनचे तत्कालीन अधिकारी व कर्मचारी यांनी या प्रकरणी हेतूपुरस्सर चौकशी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन यातील दोषी व संबंधित पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) खरे नाही.

(२) खरे नाही.

(३) कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) महानगरपालिका हे नियोजन प्राधिकरण असून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १४२ मध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पुर्वपरवानगी शिवाय, प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्यांची चौकशी करता येणार नाही तसेच त्यांचेविरुद्ध फौजदारी कारवाई प्रारंभ करता येणार नाही असे नमूद आहे. तसेच कलम १४६ मध्ये नियोजन प्राधिकरणाचा प्रत्येक अधिकारी हा लोकसेवक आहे आणि कलम १४७ मध्ये त्याने कार्यालयीन कर्तव्य बजावतांना चांगल्या हेतूने केलेल्या कृत्याकरिता किंवा घेतलेल्या निर्णयाकरिता, त्यांचे विरुद्ध कोणतीही कायदेशीर कारवाई होऊ शकणार नाही असे नमूद आहे.

अधिकाऱ्यांनी त्यांचे कामकाज करतांना, स्थानिक नागरिकांकडून अधिकाऱ्यांविरुद्ध, महानगरपालिकेकडे अथवा पोलीस विभागाकडे अनेक तथ्यहीन तक्रारी प्राप्त होत असतात. अश्या तक्रारींची शहानिशा करणे अत्यंत आवश्यक असते आणि शहानिशा केल्यानंतरच नियमानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही होणे अपेक्षित असते.

त्यास अनुसरून तत्कालीन आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांनी त्यांच्या दि.०८.०२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा पोलीस अधिक्षक, पालघर यांना खाजगी व्यक्तींकडून महानगरपालिकेच्या अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द करण्यात आलेल्या तक्रारींचे अनुषंगाने महानगरपालिकेच्या पूर्वपरवानगीशिवाय गुन्हा दाखल करण्यात येऊ नये असे कळविण्यात आले आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.